**संजय गांधी निराधार अनुदान योजना व वृध्द भूमीहीन शेतमजुरांना अर्थसहाय्य योजना जिल्हा आस्थापना वेतन व वेतनेतर खर्चासाठी सन २०२६-२७ वर्षाकरिता निधी वितरीत करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : विसयो -२०२६/प्र.क्र.३८/विसयो**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- ३० एप्रिल, २०२६ .

वाचा :-

१. शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य, क्र. विसयो २०१८/प्र.क्र.६२/ विसयो, दि.२०.०८.२०१९.
२. शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र.अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३, दि. ०९ एप्रिल, २०२६.

**शासन निर्णय :-**

सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाकरिता संजय गांधी निराधार अनुदान योजना जिल्हा आस्थापनेसाठी रुपये १५९,१८,२९,०००/- (रुपये- एकशे एकोनसाठ कोटी अठरा लक्ष एकोनतीस हजार फक्त) व वृध्द भूमीहीन शेतमजुरांना अर्थसहाय्य या योजनेवरील आस्थापनेसाठी रुपये ६३,८४,७५,०००/- (रुपये त्रेसष्ट कोटी चौऱ्याऐंशी लक्ष पंच्याहत्तर हजार फक्त) इतकी अर्थसंकल्पिय तरतूद मंजूर करण्यात आली आहे.

आता वित्त विभागाने मंजूर अर्थसंकल्पिय तरतूदीमधून ०१-वेतन, ०६- दूरध्वनी, वीज व पाणी, ११-प्रवास खर्च आणि १३-कार्यालयीन खर्च या उद्दिष्टासाठी बीम्स प्रणालीवर निधी वितरीत केला आहे. त्यानुसार संजय गांधी निराधार अनुदान योजना जिल्हा आस्थापनेसाठी रुपये **४७,७५,४८,७००**/- (रुपये सत्तेचाळीस कोटी पंच्याहत्तर लक्ष अठ्ठेचाळीस हजार सातशे फक्त) व वृध्द भूमीहीन शेतमजुरांना अर्थसहाय्य या योजनेवरील आस्थापनेसाठी रुपये **१९,१५,४२,५००**/- (रुपये एकोणवीस कोटी पंधरा लक्ष बेचाळीस हजार पाचशे फक्त) इतका निधी सर्व विभागीय आयुक्त कार्यालयांना माहे एप्रिल, २०२६ ते जून, २०२६ या कालावधीकरीता मंजूर तरतूदीमधून ०१-वेतन, ०६- दूरध्वनी, वीज व पाणी, ११-प्रवास खर्च आणि १३-कार्यालयीन खर्च या उद्दिष्टासाठी या शासन निर्णयान्वये सोबतच्या विवरणपत्राप्रमाणे निधी वितरीत करण्यास शासन याद्वारे मान्यता देत आहे.

२. सर्व विभागीय आयुक्त यांना कळविण्यात येते की, त्यांनी या सोबत जोडलेल्या विवरणपत्र- अ व ब प्रमाणे वितरीत केलेल्या अनुदानाचे वाटप त्यांच्या अधिपत्याखालील जिल्ह्यांना त्यांच्या आवश्यकतेनुसार करावे व जिल्हाधिकाऱ्यांनी त्यांच्या जिल्ह्यातील तालुक्यांना अनुदानाचे आवश्यकतेनुसार वाटप करावे.

३. सदरहू वितरीत अनुदान संजय गांधी निराधार अनुदान योजना जिल्हा आस्थापनेसाठी "मागणी क्रमांक एन-२, मुख्य लेखाशीर्ष २०५३, जिल्हा प्रशासन ०९३, जिल्हा (०१), सर्वसाधारण आस्थापना” या लेखाशीर्षाखाली आणि वृध्द भूमीहीन शेतमजुरांना अर्थसहाय्य या योजनेच्या खर्चासाठी "मागणी क्रमांक एन-२, मुख्य लेखाशीर्ष २०५३, इतर प्रशासन ०९४, (०१), इतर आस्थापना, (०१) (०१) वृध्द भूमीहीन शेतमजुरांना अर्थसहाय्य या योजनेवरील आस्थापना खर्च (२०५३ ११७८)” या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकावा.

४.     सर्व जिल्हाधिका-यांना कळविण्यात येते की, त्यांनी हा खर्च कोणत्याही परिस्थितीत त्यांच्याकडे सुपूर्द करण्यात आलेल्या अनुदानापेक्षा जास्त होणार नाही, याबाबत दक्षता घ्यावी .त्यांनी त्यांच्याकडे सुपूर्द करण्यात आलेल्या अनुदानातून केलेल्या खर्चाचा महालेखापालांच्या कार्यालयात नोंदविलेल्या खर्चाशी ताळमेळ घालून त्याप्रमाणे ताळमेळाचे विवरणपत्राची प्रत या विभागाच्या लेखा परीक्षण कार्यासनास व या कार्यासनास पाठवावी. तसेच उपयोगिता प्रमाणपत्र महालेखापालांच्या कार्यालयास त्वरित पाठवावीत व त्याची प्रत या विभागाच्या नियोजन कार्यासनास व या कार्यासनास पाठवावी. खर्चाच्या ताळमेळाचे काम व्यवस्थितरित्या पार न पाडल्यास, तसेच उपयोगिता प्रमाणपत्र महालेखापालांच्या कार्यालयास विहित वेळेत सादर न केल्यास, त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधीत जिल्हाधिकाऱ्यांवर राहील.

५.     हा शासन निर्णय वित्त विभागाच्या शासन परिपत्रक, क्र.अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३, दि. ०९ एप्रिल, २०२६ अन्वये विभागांना दिलेल्या प्रशासकीय प्राधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०४३०१८२६०२३५२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

VIVEK RAMESH SHINDE

Digitally signed by VIVEK RAMESH SHINDE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SJSA, 2.5.4.20=98222E73B61528CEE875E0CAB75E02437703C365921479FB0198FCF43D79D224, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=3D2F2D59501068679DD214122D63CB4D2D18B76F5A89CAE6ECA0162AE6701444, cn=VIVEK RAMESH SHINDE
Date: 2026.04.30 18:27:57 +05'30'

**( विवेक शिंदे )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. सर्व विभागीय आयुक्त, पुणे/कोकण/नाशिक/नागपूर/अमरावती व औरंगाबाद
२. सर्व जिल्हाधिकारी.
३. संचालक, लेखा व कोषागारे, नवीन प्रशासकीय भवन, ५ वा मजला, महाराष्ट्र राज्य , मुंबई
४. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई (२ प्रती)
५. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
६. महालेखापाल, महाराष्ट्र १/२, (लेखा परिक्षा / लेखा अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर.
७. वित्त विभाग, अर्थसंकल्प ३ ,४, ५ अर्थोपाय व व्यय १४, मंत्रालय, मुंबई.
८. निवडनस्ती,

**विवरणपत्र- अ**

**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग**

**शासन निर्णय क्रमांक : विसयो-२०२६/प्र.क्र.३८/विसयो, दिनांक ३० एप्रिल, २०२६ सोबतचे विवरणपत्र**

**मागणी क्रमांक एन-२, मुख्य लेखाशीर्ष २०५३, जिल्हा प्रशासन ०९३, जिल्हा (०१), सर्वसाधारण आस्थापना"**

**सन २०२६-२६ वर्षातील माहे एप्रिल ते जून, २०२६ करिता निधी वितरण.**

**(रुपये हजारात)**

| अ.क्र. | विभागीय आयुक्त | संगणक सांकेतांक | ०१ वेतन | ०६- दूरध्वनी, वीज व पाणी | ११-प्रवास खर्च | १३-कार्यालयीन | **एकूण** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पुणे | (०१) (०१) (२०५३ १११३) | ८१४१०.१०० | १०५.००० | ३६९.९०० | ११७४.२०० | **८३०५९.२००** |
| २ | कोकण | (०१) (०२) (२०५३ ११२२) | ७८१७६.४०० | २०५.२०० | ६३३.९०० | १२६४.८०० | **८०२८०.३००** |
| ३ | नाशिक | (०१) (०३) (२०५३ ११३१) | ९०४९८.६०० | २१६.००० | ६६६.६०० | १२६८.१०० | **९२६४९.३००** |
| ४ | नागपूर | (०१) (०४) (२०५३ ११४२) | ७४४८५.२०० | २६२.८०० | ६०८.१०० | १६१९.७०० | **७६९७५.८००** |
| ५ | अमरावती | (०१) (०५) (२०५३ ११५१) | ७८१४५.२०० | १८७.२०० | ७३१.१०० | ८६०.७०० | **७९९२४.२००** |
| ६ | औरंगाबाद | (०१) (०६) (२०५३ ११६९) | ६१६७७.३०० | ३१३.२०० | ७३६.८०० | १९३२.६०० | **६४६५९.९००** |
| | **एकूण** | | **४६४३९२.८००** | **१२८९.४००** | **३७४६.४००** | **८१२०.१००** | **४७७५४८.७००** |

**विवरणपत्र - ब**

**मागणी क्रमांक एन-२, मुख्य लेखाशीर्ष २०५३, इतर प्रशासन ०९४, (०१), इतर आस्थापना, (०१) (०१) वृध्द भूमीहीन शेतमजुरांना अर्थसहाय्य या योजनेवरील आस्थापना खर्च (२०५३ ११७८)" या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकावा.**

**सन २०२६-२६ वर्षातील माहे एप्रिल ते जून, २०२६ करिता निधी वितरण.**

**(रुपये हजारात)**

| अ.क्र. | विभागीय आयुक्त | ०१ वेतन | ०६- दूरध्वनी, वीज व पाणी | ११-प्रवास खर्च | १३-कार्यालयीन | **एकूण** |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पुणे | ३१७४०.६५० | ६.०५० | ५२.९५० | १२४.१०० | ३१९२३.७५० |
| २ | कोकण | ३१७४०.६५० | ६.०५० | ५२.९५० | १२४.१०० | ३१९२३.७५० |
| ३ | नाशिक | ३१७४०.६५० | ६.०५० | ५२.९५० | १२४.१०० | ३१९२३.७५० |
| ४ | नागपूर | ३१७४०.६५० | ६.०५० | ५२.९५० | १२४.१०० | ३१९२३.७५० |
| ५ | अमरावती | ३१७४०.६५० | ६.०५० | ५२.९५० | १२४.१०० | ३१९२३.७५० |
| ६ | औरंगाबाद | ३१७४०.६५० | ६.०५० | ५२.९५० | १२४.१०० | ३१९२३.७५० |
| | **एकूण** | **१९०४४३.९००** | **३६.३००** | **३१७.७००** | **७४४.६००** | **१९१५४२.५००** |

VIVEK RAMESH SHINDE

Digitally signed by VIVEK RAMESH SHINDE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SJSA, 2.5.4.20=98222E73B61528CEE875E0CAB75E02437703C365921479FB0198FCF43D79D224, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=3D2F2D5950106867 9DD214122D63CB4D2D18B76F5A89CAE6ECA0162AE6701444, cn=VIVEK RAMESH SHINDE
Date: 2026.04.30 18:28:20 +05'30'

**( विवेक शिंदे)**

**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**